पुढारी

# ‘के. के. वाघ’च्या माजी विद्यार्थ्यांचा लंडनमध्ये मेळावा

**• मेळाव्यात ६२ माजी विद्यार्थ्यांचा सहभाग**

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

के. के. वाघ शिक्षण संस्था संचालित महाविद्यालय, तंत्रनिकेतन व शाळेतून शिक्षण घेतलेले आणि सध्या लंडन (यू.के.) येथे नोकरीनिमित्त स्थायिक झालेल्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा लंडनमधील हॉटेल सेंट एर्मिन हॉटेल वेस्टमिन्स्टर येथे उत्साहात पार पडला. यात ६२ माजी विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.



**नाशिक : माजी विद्यार्थी मेळाव्यास उपस्थित विद्यार्थी व मान्यवर.**

लंडन येथे संस्थेचे माजी विद्यार्थी उच्च पदावर कार्यरत आहेत. या सर्व माजी विद्यार्थ्यांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ यांनी लंडन येथे माजी विद्यार्थी मेळावा आयोजनाची कल्पना मांडली होती. याप्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांच्यासह यू.के. येथील एच.सी.एल टेक्नॉलॉजीसचे सहायक उपाध्यक्ष रामयाग पांड्या, नेटवर्किंगचे विभागीय इंजिनिअर चंद्रशेखर ढाके, उद्योजक सानंद सावदेकर व स्टॅटर्जी कंपनीचे संचालक प्रणव कपाडिया उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला अधिष्ठाता डॉ. प्रीती भामरे यांनी प्रास्ताविकात गेल्या ५५ वर्षांत संस्थेने केलेल्या कार्याचा तपशील मांडला. पांड्या, ढाके यांच्यासह जेपी मॉर्गन ॲण्ड चेसच्या लीड सॉफ्टवेअर विभागाच्या उपाध्यक्षा स्नेहा मुजूमदार, आय. डब्ल्यू.जी. प्रा.लि.चे वरिष्ठ व्यवस्थापक स्वप्निल काकड, कुलिनरी शेफ ॲण्ड डिलिव्हरीज लिमिटेडचे संचालक अजय पेहेरकर, एन.एच.एस.च्या एमर्जिंग मेडिसिनचे सल्लागार डॉ. वैभव देशपांडे, अल्फा रुटीन लिमिटेडचे संचालक ऋतुजा यादव, टीसीएसचे ए.आय. सल्लागार आशिष कौल व यू.के. मडोक्स लिमिडेट प्रोजेक्ट मॅनेजर या माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. संस्थेचे सचिव प्रा. के. एस. बंदी यांनी मेळाव्याचे समन्वयन केले. प्रा. प्रिया रकिबे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. डी. एम. चांदवडकर यांनी आभार मानले.